आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० ऑगस्ट २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा, देशात नागपूर-पुणे ही सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत रेल्वे सुरु

- राज्यात सायबर तसंच आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढल्यामुळे नागरिकांनी सजग राहण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन

- नाशिकमध्ये इगतपुरी इथं एका बेकायदेशीर कॉल सेंटर रॅकेटचा सीबीआयकडून पर्दाफाश, पाच जणांना अटक

**आणि**

- चीनमध्ये सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेच्या तिरंदाजी प्रकारात भारताच्या ऋषभ यादवची कांस्य पदकाची कमाई

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या कर्नाटक दौऱ्यात पुणे ते अजनी रेल्वे स्थानकादरम्यानच्या वंदे भारत रेल्वेचे दूरस्थ पद्धतीनं लोकार्पण केलं. बंगळुरूच्या केएसआर रेल्वे स्थानकावरून प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुणे ते अजनी, बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते कटरा माता वैष्णोदेवी या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर रेल्वे स्थानकावरून या समारंभात सहभागी झाले. अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून ८८१ किमी अंतर कापणारी ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत आहे. ही जलदगती गाडी ७३ किलोमीटर प्रतितास वेगाने धावेल आणि नागपूर ते पुणे दरम्यान १० थांबे घेईल, या रेल्वेला शेगाव इथंही थांबा देण्यात आला आहे, असं मध्य रेल्वेने आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलं आहे.

**<><><><>**

देशात नागपूर-पुणे ही सर्वाधिक अंतराची वंदे भारत रेल्वे सुरु झाली असून त्यामुळे वेळेची मोठी बचत होऊन विदर्भातल्या लोकांना पुण्याशी जोडलं जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर अजनी पुणे या वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटनाप्रसंगी नागपूर रेल्वे स्थानकावर ते उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ज्या प्रवासाला आधी १६ ते १७ तास लागत होते ते अंतर आता केवळ बारा तासात कापणं शक्य होणार असून त्यासाठी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले. सध्या अहिल्यानगर वरुन रेल्वेगाडी दौन्डला जाऊन नंतर पुण्याला जाते, यामुळे नगर ते पुणे असा रेल्वेमार्ग तयार झाल्यास वेळेची बचत होईल तसंच अंतर देखील कमी होईल, यासाठी मध्य रेल्वेच्या प्रमुखांशी सकारात्मक चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि पुणे हा औद्योगिक पट्टा असून इथला विकास साधायचा तर रेल्वेचे नवीन मार्ग निर्माण करणं गरजेचं आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर ते पुणे असा नवीन एक्सप्रेस वे निर्माण करण्यात येणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर, आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढत असल्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारांकडे सजगपणे बघावं, सावध राहावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरमध्ये केलं. नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या गरुडदृष्टी समाजमाध्यम निगराणी प्रकल्पाचं सादरीकरण आणि आर्थिक फसवणूक झालेल्यांना त्यांची चोरलेली रक्कम परत देण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. नागरिकांनी फसवणूक झाल्यावर त्याची माहिती तातडीनं संबंधित यंत्रणांना द्यावी, जेणेकरून वेळीच योग्य ती कारवाई करून ही फसवणूक थांबवता येईल, असंही फडणवीस म्हणाले. देशातली सर्वात उत्तम सायबर गुन्हेगारीविरोधी यंत्रणा महाराष्ट्राकडे आहे, याचा उल्लेख त्यांनी केला. तसंच, गरुडदृष्टी प्रकल्पाद्वारे समाजमाध्यमावरच्या द्वेषपूर्ण, गुन्हेगारी पोस्ट्सवर कारवाई करण्यात आल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं. भविष्यात इतर पोलीस दलांनाही ही यंत्रणा देण्यात येईल आणि राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका ती बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही सेनादलांमधल्या समन्वयाचं आणि कार्यान्वयन एकात्मकतेचं उदाहरण आहे, असं संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं

आहे. ते आज सिकंदराबाद इथं संरक्षण व्यवथापन महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. सशस्त्र दलांमध्ये एकत्र कृतीसाठी आवश्यक धोरणात्मक दृष्टिकोन आणि भविष्यातल्या रुपरेषेबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. याशिवाय सध्याच्या तंत्रज्ञानावर आधारित युगात व्यापक क्षमता विकास, आत्मनिर्भरता आणि संरक्षण क्षेत्रातल्या परिवर्तनात्मक बदलांचं ज्ञान असणं ही काळाची गरज आहे, असं ते म्हणले.

**<><><><>**

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं नाशिकमध्ये इगतपुरी इथं सुरु असलेल्या एका बेकायदेशीर कॉल सेंटर रॅकेटचा पर्दाफाश केला. या प्रकरणी सीबीआयनं मुंबईतल्या सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यातल्या पाच जणांना अटक केली आहे. ॲमेझॉन या ई-कॉमर्स संकेतस्थळाचं ग्राहक मदत केंद्र असल्याचं भासवून या कॉल सेंटरवरुन ग्राहकांना फसवणूक करणारे फोन केले जात होते. गिफ्ट कार्ड तसंच क्रिप्टोकरन्सीच्या बाबतीतले फोनकॉल अमेरिका, कॅनडा आणि अन्य देशांच्या नागरिकांना करुन त्या माध्यमातून फसवणूक केली जात होती. आरोपींनी साठ जणांना या सेंटरवर कर्मचारी म्हणून नेमलं होतं. सीबीआयने तपासादरम्यान ४४ लॅपटॉप आणि ७१ मोबाईल फोन जप्त केले. तसंच महागड्या गाड्या, सोनं आणि मोठ्या प्रमाणात रोकडही जप्त केली.

**<><><><>**

चीनमध्ये चेंगदू इथं सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेत तिरंदाजी प्रकारात भारताच्या ऋषभ यादवनं कांस्य पदक पटकावलं आहे. दहाव्या मानांकित ऋषभनं उत्तम कामगिरी करत अनेकवेळा सुवर्णपदक जिंकलेल्या अभिषेक वर्माचा प्रभाव केला. महिलांच्या कंपाऊंड प्रकारात, मात्र भारताच्या परणीत कौर आणि मधुरा धामणगावकर यांचं आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आलं. दर चार वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत यंदा भारतीय खेळाडू तिरंदाजी, बिलियर्ड्स, रोलर स्केटिंग, वुशु आणि रॅकेटबॉल पाच खेळांमध्ये सहभागी होत आहेत.

**<><><><>**

बिहारमध्ये सुरु असलेल्या वीस वर्षांखालील रग्बी स्पर्धेत पुरुषांच्या श्रेणीत चीनचा पराभव करुन श्रीलंकेनं अंतिम फेरीत धडक मारली आहे. श्रीलंकेच्या संघानं उपांत्य फेरीत दमदार खेळ करत २६-१७ अशा फरकानं चीनवर मात केली.

<><><><>

आशियाई सर्फिंग स्पर्धेत रमेश बुधियाल हा या क्रीडाप्रकारात पुरुषांच्या खुल्या श्रेणीत पदक मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. त्यानं आज या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं.

<><><><>

ठाणे महानगरपालिकेच्या एकतिसाव्या वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात पुण्याच्या आर्मी क्रीडा संस्थेचे धर्मेंद्र तर महिला गटात नाशिकच्या रविना गायकवाड विजेते ठरले. कोरोना काळानंतर पाच वर्षाच्या खंडानंतर ही स्पर्धा यंदा उत्साहात पार पडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी ठाणे वर्षा मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर ठाणे पालिका मुख्यालयाच्या चौकातून बारा गटातल्या स्पर्धांना आरंभ झाला.

<><><><>

राज्यातल्या ४५३ विशेष शाळांमध्ये बौद्धिक अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम लागू झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय संस्थेनं हा अभ्यासक्रम प्रमाणित केला आहे. राज्याचा सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग आणि जय वकील फाउंडेशन यांच्यात वर्ष २०१९ मध्ये सामंजस्य करार झाला. त्याअंतर्गत दिशा अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित विशेष ओळखपत्र शाळांमध्ये हा अभ्यासक्रम राबवायला सुरुवात झाली अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिल्याचं या संदर्भातल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

वाशिम जिल्ह्यातल्या पंचायत समिती कारंजा इथल्या शिवन बुद्रुक इथं काल हर घर तिरंगा हर घर स्वच्छता या मोहिमेंतर्गत रॅली निघाली. शालेय विद्यार्थ्यांनी यावेळी सार्वजनिक स्वच्छता मोहिम राबवली. राज्य शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक विभाग

तसंच जल आणि स्वच्छता विभागाच्या समन्वयाने हर घर तिरंगा हर घर स्वच्छता स्वतंत्रता ही जनजागृती मोहिम सुरु आहे त्या अंतर्गत ग्रामपंचायतीने ही मोहिम राबवली.

**<><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात जनावरांमध्ये लंपी या त्वचा आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यात मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. तर देऊळगाव, मलकापुर, सिंदखेड राजा, खामगाव चिखली तालुक्यातली गावं नियंत्रित क्षेत्रं म्हणून घोषित करण्यात आली आहेत. नियंत्रित क्षेत्रात गुरांचे बाजार, शर्यती, जत्रा, प्रदर्शन यांना मनाई असून परिसरात किटक निर्मूलनासाठी स्वच्छता, फवारणीचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत.

**<><><><>**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सिंधुदुर्ग जिल्हा अध्यक्षपदाची सूत्र पुन्हा एकदा मंगेश मसके यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत. कोमसापच्या जिल्हा कार्यकारिणीच्या कुडाळमध्ये आज झालेल्या सभेत मसके यांची पुढील तीन वर्षांसाठी बिनविरोध निवड करण्यात आली.

**//<><><><>//**